# वाड्मय मंडळ

## वाड्मय मंडळ अहवाल: २०१९-२०

महाविद्यालयात मराठी विभाग आणि वाचनकट्टा सांस्कृतिक मंचच्या वतीने संयुक्त विद्यमाने दि. १३ सप्टेंबर २०१९ रोजी वाडमय मंडळाचे उद्घाटन प्रसिद्ध निसर्ग कवी प्रशांत केंदळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपले मौलिक विचार प्रकट केले, तंत्रज्ञानाच्या युगात आपण जगतो आहोत या तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण आपल्या जीवनात आमूलाग्र क्रांती घडवली आहे. मात्र त्याचे पुरेसे भान न आल्याने आपण आपल्यातल्या माणसात बिघाडही करून घेतला आहे. हाच बिघाड जर सांधायचा असेल तर आपल्याला निसर्गाच्या जवळ पोहोचावे लागेल. असे सांगून त्यांनी आपल्या निवडक कवितांचे वाचन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. शिरसाठ होते. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना साहित्याचे महत्व समजावून सांगितले. साहित्याने माणसाचे जीवन समृद्ध होते म्हणून साहित्य वाचलं पाहिजे. असे त्यांनी आग्रहाने मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. ऐश्वर्य पाटेकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. मिलींद पवार यांनी करून दिली. सूत्रसंचालन वैभव कुशारे तर आभार सायली वाघ या वाचनकट्टाच्या विद्यार्थ्यांनी केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतकर कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.




मराठी विभाग आणि वाचनकट्टा सांस्कृतिक मंच आयोजित
मंडळ उदघाटन समारंभ
प्रसिद्ध कवी आणि गीतकार मा. श्री.
अध्यक्ष: प्राचार्य मा. व्ही. एस.

# वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम अहवाल-२०१९-२०

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, आपल्या के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय काकासाहेबनगर (रानवड) आयोजित आणि वाचनकट्टा सांस्कृतिक मंच प्रस्तूत वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून ख्यातनाम साहित्यिक विजयकुमार मिठे उपस्थित होते त्यांनी आपल्या भाषणातून विचार व्यक्त केले. ते म्हणाले, पुस्तकांमुळेच तुमच्यातला माणूस घडत असतो. आजचा युवक पुस्तकांपासून दूर जातो आहे. त्याचे परिणामही तो भोगत आहे. ताण-तणाव आणि नकारात्मकतेस त्याला सामोरे जावे लागते आहे. मन आनंदी आणि सकारात्मक करण्याचं काम पुस्तके करतात. आपल्याला आपले जीवन सुंदर करायचे असेल तर पुस्तकांशिवाय दुसरा पर्याय नाही. म्हणून पुस्तके वाचली पाहिजे. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द कवयित्री शकुंतलाताई वाघ उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणातून आपले विचार व्यक्त केले, त्या म्हणाल्या, आजचा युवक मोबाईलच्या नको तेवढा आहारी जाऊन आपल्या आयुष्याचे नुकसान करून घेतो आहे. आयुष्याचा दृष्टीकोन आपल्याला वाचन देतं. म्हणून तरुणांनी वाचन केलं पाहिजे. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. शिरसाठ. वाचन कट्टा सांस्कृतिक मंचचे प्रमुख प्रा. ऐश्वर्य पाटेकर, मा. श्री. रामनाथ पानगव्हाणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाचनकट्टा सदस्य वैभव कुशारे याने केले, प्रमुख पाहुण्याची ओळख आणि प्रास्ताविक प्रा. ऐश्वर्य पाटेकर यांनी केले; तर आभार प्रदर्शन प्रा. मिलिंद पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाही वाचनककट्टा सांस्कृतिक मंचच्या  विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.


के.के.वाघ शिक्षण संस्था सुवर्ण महोत्सव
के.के.वाघ शिक्षण संस्था संचलित,
के.के.वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व
संगणक विज्ञान महाविद्यालय,
काकासाहेब नगर (रानवड) ता.निफाड, जि.नाशिक
वाचन कट्टा सांस्कृतिक मंच आयोजित
'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम
प्रमुख अतिथी
प्रसिध्द कवी लेखक
विजयकुमार मिठे
कार्यक्रमाचे अध्यक्ष
प्रसिध्द कवयित्री
सौ.शंकुतलाताई वाघ


कट्टा सांस्कृतिक मंच आयोजित
कार्यक्रमाचे अध्यक्ष
प्रसिध्द कवयित्री

# वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम अहवाल-२०२०-२१

के. के. वाघ महाविद्यालयात मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने, माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त दि. 15 ऑक्टोबर २०२० रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या 'अग्नीपंख' या आत्मचरित्राचे अंतरंग प्राचार्य व्ही. एस. शिरसाठ सर यांनी उलगडून सांगितले.

कला शाखा प्रमुख प्रा. महेश होळकर यांनी ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे वाचनाच्या संदर्भातील विचार आपल्या मनोगतातून प्रकट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. निलेश आहेर यांनी तर सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. ऐश्वर्य पाटेकर, आभार ग्रंथालय विभाग प्रमुख श्री. दादा पगार यांनी मानेले. कार्यक्रमास प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




Latitude: 20.179571
Longitude: 74.096668
Elevation: 610.44 m
Accuracy: 17.5 m
Time: 15-10-2020 08:56
Note: chemistry lab
Powered by NoteCam

# वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम अहवाल-२०२२-२३

के. के. वाघ महाविद्यालयात मराठी विभाग, विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने, माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त दि. 15 ऑक्टोबर २०२२ रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रसिद्ध कवी आणि पत्रकार संदीप देशपांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी 'विनोदाच्या गावा जावे' या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व समजावून सांगितले. पुस्तकांमुळेच माणसाचे आयुष्य बदलून जाते. पुस्तक माणसाला मार्ग दाखवतात, म्हणून पुस्तक वाचलं पाहिजे.

मराठी विभाग प्रमुख प्रा. ऐश्वर्य पाटेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले, ते म्हणाले पुस्तक हे ज्ञान अपडेट करण्याचे माध्यम आहे. पुस्तकांच्याच जोरावर माणसाने क्रांती केली आहे. म्हणून पुस्तकास आपल्या आयुष्यात महत्वाचे स्थान दिले पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गवारे उपस्थित होते, त्यांनी आपल्या मनोगतातून ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर थोडक्यात प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो अधिकारी प्रा. स्मिता बनकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निकिता पगार यांनी तर आभार प्रा. प्रवीण सोमासे यांनी मानले.


Latitude: 20.179415
Longitude: 74.096386
Elevation: 607.74±7 m
Accuracy: 51.8 m
Time: 15-10-2022 11:14
Note: वाचन प्रेरणा दीन


Latitude: 20.179395
Longitude: 74.096386
Elevation: 607.74±7 m
Accuracy: 49.4 m
Time: 15-10-2022 11:52
Note: k k wagh वाचन प्रेरणा दीन


के.के.वाघ शिक्षण संस्था संचलित,
के.के.वाघ कला, वाणिज्य, विज्ञान
संगणक विज्ञान महाविद्यालय,
काकासाहेब नगर (रानवड) ता.निफाड, जि.नाशिक
पद्मश्री काकासाहेब वाघ
वाचन कट्टा सांस्कृतिक मंच आयोजित
कार्यक्रम
Latitude: 20.179754
Longitude: 74.097112
Elevation: 608.34±31 m
Accuracy: 929.4 m
Time: 15-10-2022 10:29
Note: वाचन प्रेरणा दीन

# भाषा गौरव दिन अहवाल-२०२२-२३

काकासाहेबनगर येथील के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान, संगणक विज्ञान महाविद्यालयात मराठी विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसा निमित भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी रवींद्र मालुंजकर लाभले. त्यांनी 'गप्पा कवितेच्या' या विषयावर बोलताना सांगितले, भाषा मानवी व्यक्तिमत्वाला झळाळी प्राप्त करून देणारी शक्ती आहे. म्हणून भाषेची जपणूक आणि संवर्धन करण्याची जबाबदारी आपली आहे. कवितेने भाषेचं काळीज तोलून धरलं आहे. कवितेमुळेच भाषेला नित्यनवीन धुमारे फुटत असतात. अशी भाषेची महती सांगून कवी कुसुमाग्रजांच्या कवितांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना प्रभावित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गवारे होते, त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की भाषा ही मानवाला मिळालेली देणगी आहे. तिचा वापर जसा व्यवहारात केला जातो तसा साहित्यातही केला जातो. म्हणून आपण आपल्या मराठी भाषेचं महत्व जाणलं पाहिजे.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रवीण सोमासे यांनी केले. सूत्रसंचालन मराठी विभागाच्या साक्षी जाधव आणि यांनी तर आभार प्रा. भाग्यश्री मोरे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. निकिता पगार, प्रा. शीतल जगताप, प्रा, बाळकृष्ण फडे, प्रा. वैशाली शिंदे, प्रा. सुजित मेधने, प्रा. ज्योती बोरगुड, श्री. ज्ञानेश्वर गवळी, श्री. सचिन काळे आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येनं उपस्थित होते.




शिक्षण संस्था संचलित
विज्ञान व संगणक विज्ञान
ता.निफाड जि.नाशिक -४२२३०८
प्रस्तूत
मराठी विभाग,विद्यार्थी
राष्ट्रीय सेवा योजना आयोजित
दिना निमित
तेच्या'
९:०० वाजता
प्रा. ऐश्वर्या पाटेकर
मराठी विभाग


# वाडमय मंडळ अहवाल- २०२२-२३

महाविद्यालयात मराठी विभाग आणि  विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वाडमय मंडळाचे उदघाटन प्रसिद्ध कवी राजेंद्र सोमवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी ‘कवितेची पाऊलवाट’ या विषयावर आपले विचार प्रकट केले. सर्व साहित्य प्रकारात कविता ही श्रेष्ठ मानली गेली आहे. कमीत कमी शब्दात मानवी जीवनाला व्यक्त करण्याची ताकद फक्त कवितेतच आहे. तिचा प्रभाव जन-माणसावर तात्काळ होतो. माणसाला त्याच्या आयुष्याचा साक्षात्कार घडवत असते. थोडक्यात सांगायचे तर कविता ही मानवी जीवनाच्या अंतरंगाचा आरसा आहे. कविता या साहित्य प्रकाराचा सांगोपांग विचार करताना त्यांनी आपल्या कविताही विद्यार्थ्यांनासमोर सादर केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गवारे होते. त्यांनी आपल्या मनोगतातून साहित्याचे मानवी जीवनातील महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख  प्रा. ऐश्वर्य पाटेकर यांनी, सूत्रसंचालन साक्षी जाधव आणि ऋतुजा जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण सोमासे यांनी केले.

कार्यक्रमास  संगणक शाखा प्रमुख प्रा. शीतल जगताप, विज्ञान शाखाप्रमुख प्रा. वैशाली शिंदे,  प्रा.निकिता पगार, प्रा. पूजा वाढवणे, प्रा. सोनाली बेंडकुळे, प्रा. अर्चना ताकाटे, प्रा. माधुरी मोते, प्रा. जयश्री कापडी, प्रा. ज्योती बोरगुडे, प्रा. निलेश आहेर, प्रा. सुजित मेधने श्री. ज्ञानेश्वर गवळी, श्री. सचिन काळे  आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येनं उपस्थित होते.


GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
53HW+WQ2, Nashik, Maharashtra 422308, India
Lat 20.179695°
Long 74.096479°
18/03/23 09:47 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nashik, Maharashtra, India
53HW+WQ2, Nashik, Maharashtra 422308, India
Lat 20.179695°
Long 74.096479°
18/03/23 10:17 AM GMT +05:30